www.PapaCambridge.com

UNIVERSITY OF CAMBRIDGE INTERNATIONAL EXAMINATIONS
General Certificate of Education
Advanced Subsidiary Level and Advanced Level

**MARATHI**

**8688/02**
**9688/02**

Paper 2 Reading and Writing

October/November 2005

**1 hour 45 minutes**

Additional Materials: Answer Booklet/Paper

**READ THESE INSTRUCTIONS FIRST**

If you have been given an Answer Booklet, follow the instructions on the front cover of the Booklet.
Write your Centre number, candidate number and name on all the work you hand in.
Write in dark blue or black pen on both sides of the paper.
Do not use staples, paper clips, highlighters, glue or correction fluid.
Dictionaries are not permitted.

Answer **all** questions.
Write your answers in **Marathi** on the separate Answer Paper provided.
You should keep to any word limits given in the questions.
At the end of the examination, fasten all your work securely together.
The number of marks is given in brackets [ ] at the end of each question or part question.

**सर्वप्रथम खालील सूचना वाचा.**

तुम्हाला उत्तरपुस्तिका दिली असल्यास तिच्या मुखपृष्ठावरील सूचनांचे पालन करा.

पूरक उत्तरपृष्ठांचा उपयोग केल्यास प्रत्येकावर तुमचा परीक्षा केंद्र क्रमांक, अनुक्रमांक (रोल नंबर) व तुमचे नाव लिहा.

पृष्ठाच्या दोन्ही बाजूने उत्तरे लिहावीत. त्यासाठी गडद निळ्या अथवा काळ्या रंगाच्या शाईचा वापर करावा.

टाचणी अथवा टाचण्याची कोणतीही अन्य साधने, वाक्यांना अधोरेखित करण्यासाठी रंगीत लेखणींचा वापर, डिंक किंवा चूक मजकूर खोडण्यासाठी वापरण्यात येणा-या द्रव पदार्थाचा अथवा तशाच प्रकारच्या शाईचा वापर करू नये.

शब्दकोषांचा उपयोग करण्यास मनाई आहे.

**सर्व** प्रश्न सोडवा.

उत्तर लिहिण्यासाठी देण्यात आलेल्या वेगळ्या पृष्ठांवर प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा.

प्रश्नात नमूद केलेल्या शब्दसंख्येच्या मर्यादेत उत्तर लिहावे.

परीक्षेच्या शेवटी उत्तरांची सर्व पृष्ठे व्यवस्थित बांधावीत.

प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी अथवा पोट प्रश्नांच्या शेवटी कंसात **[ ]** प्रश्नांचे गुण दिले आहेत.



UNIVERSITY of CAMBRIDGE

www.PapaCambridge.com

## विभाग 1

**सर्वप्रथम पुढील गद्य उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यानंतर त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

करोडो वर्षांपूर्वी पृथ्वीवर घनदाट जंगले होती. त्यात असंख्य वन्यप्राणी राहात होते. विशालकाय डायनोसोरपासून तो लहान कीटकापर्यंत असंख्य प्राणी होते. निसर्ग व पर्यावरण यांच्याशी संतुलन साधीत राहत होते. परंतु कोणत्याही प्रजाती या काही लक्ष वर्षांपर्यंतच अस्तित्वात असतात. कालांतराने काही लुप्त होतात. काहींचा बदललेल्या वातावरणाला अनुकुल असा त्यांचा जैविक गरजेपोटी नवीन स्वरुपात विकास होतो. प्रजातींच्या लुप्त होण्यामागे काही कारणे होती. पर्यावरणातील बदल, नैसर्गिकरित्या जीवन जगण्यातील बदल, प्रचंड उल्कापात,ज्वालामुखीचा उद्रेक, जलप्रलय किंवा कोरडा दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्ती आणि त्यांच्यातील प्रजजन क्षमतेची कमतरता ही प्रमुख कारणे होती. उत्पत्ती, स्थिती आणि लय या निसर्गक्रियेला अनुसरून संतुलन साध्य होत होते.

अलिकडे वन्यप्राण्यांची संख्या द्रुतगतीने रोडावत आहे. काही प्रजाती पृथ्वीवरून लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. एकेकाळी मोठ्या संख्येने वावरणारे चित्ते, सिंह, हत्ती, वाघ हे मांसाहारी प्राणी व काळवीट, पांडा, गोरीला व इतर माकडांच्या जाती याही नामशेष होण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. एवढ्या झपाट्याने गेल्या शंभर वर्षात प्राण्यांच्या संख्येत होणारी ही घट जगातल्या सर्व देशांसमोर एक यक्ष प्रश्न आहे. वन्यप्राणी, वृक्षलता यांची संख्या कमी होण्यामागे पृथ्वीवरील व पर्यायाने सर्व देशातील बदललेले पर्यावरण हे प्रमुख कारण आहे. गेल्या काही शतकांत मानवाने स्वतःचा केलेला भौतिक विकास यामुळेच पर्यावरणाचा धोका अस्तित्वात आला.

औद्योगिकरण व विज्ञानाच्या क्षेत्रात मानवाने प्रगती केली. त्यामुळे कारखाने, उद्योगधंदे अस्तित्वात आले. रासायनिक कचरा वाढला. नद्या, नाले, तलाव, समुद्र यांचे पाणी प्रदुषित झाले. कारखान्यातील दुषित धूर व रासायनिक गंधांचे हवेत होणारे प्रसरण, यामुळे सारे वातावरण दुषित झाले. वाढती लोकसंख्या, शेतीसाठी जंगले नष्ट करणे, चराईचे क्षेत्र व्यापक होणे यामुळे झपाट्याने बदललेल्या पर्यावरणाशी प्राण्यांना संतुलन साधणे दुर्धर झाले. परिणामी त्यांच्या प्रजाती व जाती संख्येने कमी होत गेल्या. पर्यावरणातील बदल हा जसा प्राण्यांना, वृक्षलतांना व पक्ष्यांना घातक ठरत आहे तेवढाच तो माणसांनाही मारक होत आहे. वन्यप्राणी व जंगले यांचे अस्तित्व धोक्यात आले तर मानवाचेही अस्तित्व धोक्यात येईल.

प्राणी व वृक्षलता जगतील तरच मनुष्य जगेल हे लक्षात आल्यावर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय योजना आखण्यात आल्यात. 'युनो','आययुसीएन', 'डब्ल्यु डब्ल्यु एफ' सारख्या जागतिक संस्था त्यासाठी सरसावल्यात. योजना राबविण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर निधी उभारण्यात आला. त्यासाठी अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने उभारून पशुपक्ष्यांच्या शिकारीवर निर्बंध घालणारे कायदे अंमलात आलेत. प्राण्यांचे व वृक्षलतांचे प्राण वाचतील तरच मानवप्राणी जिवंत राहील हे जाणून लुप्त होणा–या व अस्तित्वात असलेल्या वन्यप्राण्यांना, वृक्षलतांना व पक्ष्यांना जगविण्याचा जागतिक स्तरावर प्रयत्न होत आहे.

**1** **खाली दिलेले शब्द वरील उता–यातील आहेत. या शब्दांचे समान अर्थ असलेले शब्द लिहा व त्यांचा वाक्यात उपयोग करा. शब्द वा वाक्ये वरील उता–यातील नसावीत.**

**(i)** उद्रेक [1]

**(ii)** द्रुतगती [1]

**(iii)** यक्षप्रश्न [1]

**(iv)** भौतिक विकास [1]

**(v)** दुर्धर [1]

www.PapaCambridge.com

**2** **खाली दिलेली संकल्पना स्पष्ट करणारे अचूक शब्द वरील उता–यातून निवडा व लिहा.**

उदाहरणार्थ :- **मनुष्याचा शिरकाव करण्याला कठीण जंगले.**

उत्तर :- घनदाट जंगले.

**(i)** काळाच्या ओघात नाहिसे होणे. [1]

**(ii)** आकाशातील ग्रहतारे पृथ्वीवर आदळणे. [1]

**(iii)** कारखाने व यंत्रांच्या शोधामुळे आलेली नवीन समाज रचना. [1]

**(iv)** एखादी गोष्ट वापरण्यासाठी / उपयोगासाठी खराब होणे. [1]

**(v)** कायद्याने अटकाव करणे. [1]

**3** **पुढील प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. उत्तरे स्वत:च्या शब्दांत लिहावीत. उता–यातील शब्द वा वाक्ये उत्तरात नसावीत. प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी 5 गुण अतिरिक्त आहे. (एकूण गुण 15+5= 20)**

**(i)** वन्य प्राण्यांच्या प्रजाती कोणत्या कारणांमुळे लुप्त झाल्यात? [4]

**(ii)** जगातल्या सर्व देशांना कोणता प्रश्न भेडसावीत आहे? [2]

**(iii)** औद्योगिकरणामुळे पर्यावरणात कोणते बदल घडून आलेत? [4]

**(iv)** 'प्राणी सुरक्षित तर मनुष्य सुरक्षित' हा विचार स्पष्ट करा? [3]

**(v)** प्राण्यांना वाचविण्यासाठी कोणत्या उपाय–योजना अंमलात आल्यात? [2]

**भाषेची गुणवत्ता** [5]

**एकूण गुण** [20]

www.PapaCambridge.com

## विभाग 2

**पुढील दुसरा गद्य उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

प्राचीन भारतात वन्यप्राणी व वने यांच्या संरक्षणाचे महत्त्व ऋषिमुनींनी ओळखले होते. आपल्या आश्रमाभोवती वनश्रींची जोपासना करून त्यात वन्यप्राण्यांना मुक्तपणे विचरण करू दिले. वन्यप्राणी, वृक्षलता व पशुपक्ष्यांचे महत्त्व त्यांनी पुराणातूनही जोपासले. पुराणातील कथांतून नंदीबैल, सिंह, वाघ, उंदीर, कुत्रा, घुबड, गरूड,पोपट या व यासारख्या अनेक लहानमोठ्या पशुपक्ष्यांना देवदेवतांच्या वाहनांचे मानकरी केले. या कथांमधून प्राण्यांबद्दल सहानुभूती, भूतदया, अहिंसा, धार्मिकता व सर्वाप्रती प्रेमभाव व्यक्त करणे ही त्यामागची भावना होती.

भारत वन्यप्राण्यांच्या बाबतीत अतिशय समृद्ध देश आहे. या देशाच्या भौगोलिक रचनेत विविधता आहे. त्यामुळे अनेक प्रकारच्या वन्यप्राण्यांच्या प्रजाती व प्रकार आढळतात. सस्तन प्राण्यांच्या 350 प्रजाती तर पक्ष्यांच्या 1250 प्रजाती असून त्यांच्या 2100 प्रकारच्या जाती आहेत. कीटकांच्या 2100 प्रकारच्या जाती आहेत. भारताचा राष्ट्रीय प्राणी सिंह व राष्ट्रीय पक्षी मोर आहे.

अलिकडे भारतातल्या सर्वसामान्य माणसाला वन्यप्राणी, पशुपक्षी व जंगले यांचे महत्त्व वाटेनासे झाले आहे. या उदासीन वृत्तीमुळे प्राण्यांच्या प्रजाती लुप्त होत आहेत. एकेकाळी संपूर्ण उत्तर भारतात भ्रमण करणारे सिंह आता गुजराथच्या गिर अभयारण्यातच दिसतात. संपूर्ण भारतात आढळून येणारे व विशेषत: 'रॉयल टायगर ऑफ बंगाल' म्हणून विख्यात असलेले वाघ एकेकाळी संख्येने 40,000 होते. त्यांची संख्या आता फक्त 2040 उरली आहे. काश्मीर, मध्यप्रदेश, हिमालयाचा तराई प्रदेश व मणिपूर या भागातील हरणांच्या काही प्रजाती लुप्त होत आहेत. हरणांची 'बारसिंगा' ही जात आता फक्त मध्यप्रदेशातल्या कान्हाकिसली राष्ट्रीय उद्यानातूनच दिसून येते. हिमालयातील जंगलातून आढळणारा कस्तुरी मृग आता अभावानेच आढळतो. प्राण्यांना अभय देण्याबद्दल उदासीनता व पर्यावरणातील घातक बदल यामुळे त्यांची संख्या उत्तरोत्तर कमी होत आहे. औद्योगिकरणामुळे पर्यावरणात झालेला बदल, लोकसंख्यावृध्दी, जगलांची कटाई, शेतीचा विस्तार, चराईच्या क्षेत्रात वाढ, नैसर्गिक जीवन जगण्यातील बदल ही सारी कारणे पर्यावरणात परिवर्तन करीत आहेत. याच्या जोडीला पशुपक्षी व वन्यप्राण्यांची शिकार करून त्यांची कमावलेली कातडी, हस्तीदंत, औषधासाठी अवयवाचे विशिष्ट भागांचे मांस इत्यादी निर्यात करून देशाची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी प्रयत्न होत आहेत. देशाचा आर्थिक विकास व गरीबी निर्मूलन या महत्त्वाच्या कार्यक्रमांपुढे वन्यप्राणी संरक्षणाचे महत्त्व कमी लेखण्यात आले.

बदलत्या पर्यावरणामुळे वन्य प्राण्यांइतकेच मनुष्याचेही जीवन धोक्यात येत आहे हे लक्षात आल्यावर भारत सरकारने वन्यप्राण्यांच्या अस्तित्वासाठी योजना आखल्यात. देशाच्या घटनेतील तरतूद लक्षात घेऊन **वन्यप्राणी संरक्षण कायदा 1972** साली अंमलात आणला. त्यासाठी युध्दपातळीवर सरकारी यंत्रणा उभारली. यापूर्वी देशातील वन्यप्राण्यांची देखरेख करण्या-या खासगी संस्था 'बॉम्बे नॅशनल हिस्ट्री सोसायटी' (1883) व ' वाईल्ड लाईफ प्रिझरवेशन सोसायटी' (1958) या जुन्या संस्थांचे सहकार्य घेतले. आंतरराष्ट्रीय संस्थांच्या मार्गदर्शनाखाली देशात 19 राष्ट्रीय उद्याने 1204 अभयारण्ये उभारलीत. त्यापैकी महाराष्ट्रात 4 राष्ट्रीय उद्याने व 10 अभयारण्ये असून मेळघाट येथील 'व्याघ्र संरक्षण प्रकल्प' महत्त्वाचा आहे. प्राण्यांच्या अवयवांची, हस्तीदंतांची व मासांची अनधिकृत निर्यात थांबविण्यासाठी जाचक कायदे केलेत. अशारीतीने वन्यप्राण्यांच्या लुप्त होणा-या प्रजाती, पशुपक्षी यांच्या संरक्षणासाठी विविध योजना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांच्या मदतीने कार्यान्वियित केल्यात. आज त्याचे चांगले परिणाम दृष्टीपंथात येत आहेत.

www.PapaCambridge.com

4 **पुढील प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. उत्तरे स्वतःच्या शब्दात लिहावीत. उता-यातील शब्द वा उत्तरात नसावीत.**

**प्रत्येक प्रश्नांच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत. एकुण गुण 15 + 5 = 20 गुण.**

(i) प्राचीन काळातील ऋषि-मुनींनी वन्यप्राण्यांबद्दल वाटणारी सहानुभूती कशा प्रकारे व्यक्त केली? [3]

(ii) भारतात वन्य्प्राण्यांच्या प्रजाती मोठ्या संख्येने का आढळतात ? [2]

(iii) भारतातील वन्यप्राण्यांच्या सद्य परिस्थितीवर प्रकाश टाका ? [3]

(iv) भारताने आर्थिकदृष्ट्या समृद्ध होण्यासाठी व गरीबी निर्मूलनासाठी वन्यप्राण्यांकडे का दुर्लक्ष केले ? [3]

(v) प्राण्यांच्या संरक्षणासाठी भारत सरकारने कोणती पाऊले उचललीत? [4]

5 **पुढील प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. दोन्ही उत्तरांची मिळून होणारी शब्दसंख्या 140 पर्यंत मर्यादित असावी.**

(i) दोन्ही उता-यांच्या आधारे वन्यप्राण्यांच्या अस्तित्त्वाचा प्रश्न मानवाच्या अस्तित्त्वाशी कसा निगडीत आहे ते स्पष्ट करा ? [10]

(ii) तुमच्या देशातील वन्यप्राण्यांच्या समस्येवर थोडक्यात प्रकाश टाका. [5]

**भाषेची गुणवत्ता** [5]

**एकूण गुण** [20]

BLANK PAGE

www.PapaCambridge.com

**BLANK PAGE**

www.PapaCambridge.com

**BLANK PAGE**

www.PapaCambridge.com

Permission to reproduce items where third-party owned material protected by copyright is included has been sought and cleared where possible. Every reasonable effort has been made by the publisher (UCLES) to trace copyright holders, but if any items requiring clearance have unwittingly been included, the publisher will be pleased to make amends at the earliest possible opportunity.

University of Cambridge International Examinations is part of the University of Cambridge Local Examinations Syndicate (UCLES), which is itself a department of